ePaper

वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 03 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## “युद्धाची सुरुवात तुम्ही केली, शेवट आम्ही करु”



**महाईन्यूज**

### उद्या अंक नाही

धुलिवंदन निमित्त मंगळवारी महाईन्यूज कार्यालयास सुट्टी असल्याने बुधवारचा अंक प्रसिद्ध होणार नाही.
- संपादक

बातम्यांसाठी वाचत राहा
mahaenews.com

### इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर केंद्राकडून राज्यांना महत्त्वाच्या सूचना

# भारत अलर्ट मोडवर!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांचा अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात मृत्यू झाला. याचे पडसाद आता भारतात उमटायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे भारतातील संरक्षण यंत्रणांनाही सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आल्याचे वृत्त वृत्तसंस्थांनी दिले आहे. तसंच, केंद्रीय गृहमंत्रालयाने राज्यांनाही सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.**

गेल्या काही दिवसांपासून इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ले वाढवले असून या तिन्ही देशांतील संघर्ष वाढला आहे. त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वच देशांमध्ये होत असून भारतातही याचे पडसाद उमटायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे २८ फेब्रुवारी रोजी सर्व राज्यांना पाठवलेल्या पत्रात मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अतिरेकी आणि जागतिक दहशतवादी गटांच्या सोशल मिडिया पोस्ट्सवर लक्ष ठेवण्यास सांगितलं आहे, असं वृत्त पीटीआयने दिलंय.

तसंच, देशात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याचीही दक्षता ठेवण्याचा सल्ला राज्यांना देण्यात आलाय. तर, इस्रायल आणि अमेरिकेचे वाणिज्य दूतावास आणि इतर राजनैतिक कार्यालये असलेल्या राज्यांना कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी सुरक्षा वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.





## पंतप्रधान मोदींची सुरक्षा यंत्रणांबरोबर बैठक


पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी रात्री देशाच्या सुरक्षा आणि धोरणात्मक बाबींवरील सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था असलेल्या सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची बैठक घेतली. सीसीएसने पश्चिम आशियातील ताज्या संघर्षामुळे उद्भवलेल्या परिस्थिती आणि तेथे अडकलेल्या भारतीयांबाबत चर्चा केल्याचे वृत्त आहे.

## खामेनी यांच्या मृत्यूनंतर भारतात निदर्शने

अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर त्याचे भारतातही पडसाद उमटले. काश्मीरपासून कर्नाटकपर्यंत विविध शहरांमध्ये मुख्यतः शियापंथीय मुस्लिमांनी रस्त्यावर उतरून खामेनी यांच्या मृत्यूबद्दल शोक आणि संताप व्यक्त केला. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जम्मू आणि काश्मीरच्या जम्मू, श्रीनगर, बारामुल्ला, बडगाम, बांदीपुरा, अनंतनाग आणि पुलवामा येथे मोठ्या प्रमाणात लोक एकत्र आले होते. यावेळी अमेरिकाविरोधी आणि इस्रायलविरोधी घोषणा देण्यात आल्या.

## काश्मीरच्या नेत्यांकडून शांततेचे आवाहन

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी इराणमधील घडामोडींबद्दल चिंता व्यक्त केली आणि निदर्शकांना शांततेचे आवाहन केले. सध्या इराणमध्ये असलेले जम्मू-काश्मीरचे विद्यार्थी, रहिवासी यांच्या सुरक्षेची खबरदारी घेण्यासाठी आपले सरकार परराष्ट्र मंत्रालयाशी समन्वयाने काम करत आहे, असे अब्दुल्ला यांनी सांगितले. पीडीपीच्या नेत्या मेहबुबा मुफ्ती, काश्मीरचे मुख्य धर्मगुरू मिरवैज उमर फारुख यांनीही खामेनी यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला.



# पुणे मेट्रोत नवा नियम लागू!

## तिकीट स्कॅन केल्याशिवाय AFC गेट उघडणार नाही; ३ मार्चपासून अंमलबजावणी

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहरातील प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. पुणे मेट्रो प्रशासनाने स्थानकांवरील ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन (AFC) गेट्समध्ये मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. उद्या ३ मार्चपासून ही नवी प्रणाली लागू होणार आहे.**



आतापर्यंत मेट्रो स्थानकांवरील AFC गेट्स उघड्या स्थितीत असत. प्रवाशांनी तिकीट स्कॅन केल्यानंतर हिरवा दिवा लागून प्रवेश मिळत असे. तिकीट नसल्यास किंवा चुकीचे तिकीट असल्यास फ्लॅप गेट्स बंद होत असत. मात्र नव्या प्रणालीअंतर्गत AFC गेट्स नेहमी बंद राहणार असून तिकीट स्कॅन केल्यावरच गेट उघडेल.

प्रवाशांनी क्यूआर कोड तिकीट, मेट्रो कार्ड किंवा व्हॉट्सअ‍ॅप तिकीट स्कॅन केल्यानंतर गेट उघडेल आणि प्रवेशानंतर दरवाजे आपोआप बंद होतील. तिकीट नसल्यास किंवा चुकीचे तिकीट असल्यास गेट उघडणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रवाशांची सुरक्षितता वाढवणे, स्थानकांवरील शिस्त राखणे आणि विनातिकीट प्रवास रोखणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे मेट्रो प्रशासनाने सांगितले. त्यामुळे प्रवाशांनी स्थानकावर प्रवेश करताना वैध तिकीट किंवा मेट्रो कार्ड जवळ बाळगणे आवश्यक आहे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### धूलीवंदनाला पुणे मेट्रो अर्धा दिवस बंद!

धूलीवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर ३ मार्च २०२६ रोजी पुणे मेट्रो सेवा अर्धा दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. मेट्रो प्रशासनाच्या माहितीनुसार, ३ मार्च रोजी सकाळी ६.०० ते दुपारी ३.०० या वेळेत प्रवासी सेवा पूर्णपणे बंद राहील. दुपारी ३.०० नंतर ते रात्री ११.०० पर्यंत मेट्रो सेवा नियमित वेळापत्रकानुसार सुरू राहणार आहे. सणाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची सुरक्षितता आणि आवश्यक सुरक्षाव्यवस्था लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल मेट्रो प्रशासनाने दिलगीर व्यक्त केली आहे.



# गणेशखिंड रस्त्यावरील उड्डाणपूल वाहतुकीसाठी राहणार बंद!

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. या रस्त्यावर उड्डाणपूल तसेच मेट्रो मार्गाचे काम सुरू असल्याने सकाळी आणि संध्याकाळी वाहतूक कोंडी होते. वाहनचालक तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडत असल्याने वाहनचालकांकडून नाराजी व्यक्त केली जाते.**





बाणेर, बालेवाडी यासह हिंजवडी आयटी पार्क कडे जाण्यासाठी गणेशखिंड रस्त्याचा वापर नागरिकांकडून केला जातो. हिंजवडी येथील कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हा रस्ता अत्यंत महत्वाचा आहे. मात्र या रस्त्यावर होत असलेल्या वाहतुकीच्या समस्येमुळे नोकरदार हैराण झाले आहेत. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इतर शैक्षणिक संस्थाकडे जाण्यासाठी देखील गणेशखिंड रस्त्याचा वापर केला जातो.

या रस्त्यावरील आनंदऋषीजी चौकात (पुणे विद्यापीठ चौक) येथे काही वर्षांपूर्वी उभारण्यात आलेला उड्डाणपूल पाडून टाकण्यात आला असून येथे नवीन उड्डाणपूल उभारण्यात येत आहे. तसेच या रस्त्यावर शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो प्रकल्पाचे काम देखील गेल्या काही वर्षापासून सुरु असल्याचे वाहतूक कोंडीत अधिकच भर पडते. या रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महापालिका तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने विविध उपाय योजना सुरू करण्यात आले आहेत. काही चौकातील यू टर्न बंद करण्यात आले असून याचा फायदा वाहतूक सुरळीत होण्यासाठी होत असल्याचे समोर आले आहे.

याच रस्त्यावर असलेल्या कृषी महाविद्यालया समोरील उड्डाणपुलाबाबत महत्त्वाचा निर्णय आता महापालिका प्रशासनाने घेतला आहे. या उड्डाणपुलाची एक बाजू आता वाहन चालकांसाठी बंद ठेवली जाणार आहे. या उड्डाणपुलाच्या देखभाल-दुरुस्तीचे काम पुणे महानगरपालिकेने सुरू केले आहे. त्यामुळे या उड्डाणपुलाची एक बाजू रात्रीच्या वेळी वाहतुकीसाठी बंद ठेवली जाणार आहे. याची अंमलबजावणी करण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे.

### कोणत्या वेळेत राहणार वाहतूक बंद?

या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्याने दिवसा काम करणे अशक्य आहे. महापालिकेने हे काम दिवसाच्या वेळेस सुरू केल्यास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीत भर पडून त्याचा त्रास नागरिकांना तसेच वाहन चालकांना होणार आहे. त्यामुळे दररोज रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत या उड्डाणपुलाचा एक मार्ग बंद राहणार आहे. एक महिन्याच्या काळात रात्रीच्या वेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे जाणाऱ्या दोन पैकी एक मार्ग बंद बंद ठेवला जाईल. टप्प्याटप्प्याने हे काम पूर्ण केले जाणार आहे असे, महापालिकेतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### काय केले जात आहे काम?

महापालिकेने या उड्डाणपुलावरील १४ बेअरिंग बदलण्याचे काम यापूर्वी पूर्ण केले आहे. मात्र, दिवसभर या पुलावरून ये जा करणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असल्याने पुलाच्या सांध्यांचे काम प्रलंबित राहिले आहे. हे काम पूर्ण होणे गरजेचे आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर या उड्डाणपुलाची स्थिती अधिकच मजबूत होणार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने हे काम करण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती महापालिकेच्या प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता दिनकर गोजारे यांनी दिली. पुढील महिनाभर हे काम सुरू राहणार आहे.

# 'महिंद्रा'मध्ये ऐतिहासिक वेतनवाढ करार!

## आमदार महेश लांडगे यांची कंपनी व्यवस्थापन- संघटनेत यशस्वी मध्यस्थी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महिंद्रा लॉजिस्टिक लि. आणि स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यातील तिसरा वेतनवाढ करार संपन्न झाला असून, हा लॉजिस्टिक उद्योगातील इतिहासातील सर्वात मोठा विक्रमी करार ठरला आहे. हा करार चाकण औद्योगिक वसाहतीत निघोजे येथील कंपनीच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात औपचारिक केला गेला.या करारानंतर कामगारांनी समाधान व्यक्त केले आहे.**



करार सोहळ्यात संघटनेच्या वतीने प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवन येळवंडे, तसेच कंपनीकडून असोसिएट व्हा. प्रेसिडेंट एच. आर. संजय गावडे आणि असिस्टंट व्हा. प्रेसिडेंट एच. आर. प्रदीप झोटिंग प्रमुख उपस्थित होते.

करारातील प्रमुख सुविधा पुढीलप्रमाणे आहेत. यामध्ये एकूण पगारवाढ: ₹15,500/- (CTC मध्ये), रेशो ३०%, ३०%, ४०%, विभागणी २५% DA बेसिक, ७५% इतर अलाऊन्स. कराराचा कालावधी: ०१/०३/२०२६ ते ३१/०८/२०२९ (साडेतीन वर्षे). रजा सुधारणा: ३६६ कामगारांच्या रजेत ३ दिवसांची वाढ, सर्वांसाठी समान रजा. पगाराची उचल: ग्रॉस पगाराच्या तीनपट वैद्यकीय कारणांसाठी मंजूर. ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी: ₹5 लाख. ग्रुप टर्म इन्शुरन्स पॉलिसी: ₹5 लाख. करार वेळेत पूर्ण होण्याबद्दल बक्षीस: ₹7,500/- सर्व कामगारांना. बोनस: मागील आर्थिक वर्ष २४–२५: ₹39,200/-, २०२६–२९ दरम्यान वाढीव रक्कम: ₹43,800 ते ₹59,100/-उत्पादन वाढ: पहिल्या तीन वर्षांत दर वर्षी ७%, पुढील सहा महिन्यांसाठी ३.५% असा आहे.

करारावर सह्या करताना संघटनेच्या वतीने आमदार महेश लांडगे, संघटनेचे मार्गदर्शक रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवनशेठ येळवंडे आणि व्यवस्थापनाकडून संजय गावडे, प्रदीप झोटिंग, धीरज सिंह, निंबा भांबरे, नामदेव टाचतोडे, राहुल भागवत यांचा समावेश होता. कार्यक्रमात सर्व उपस्थित कामगारांना मार्गदर्शन मिळाले आणि आनंद साजरा करण्यासाठी पेढे वाटणे आणि फटाके फोडण्याचा सोहळा पार पडला. संघटनेच्या नेतृत्वाखाली आणि व्यवस्थापनाच्या सहकार्याने संपन्न झालेला हा करार कामगारांच्या हक्कांचा मजबूत दाखला असून, लॉजिस्टिक क्षेत्रातील मानवी विकासाला नवीन दिशा देणारा ठरला आहे.

> महिंद्रा लॉजिस्टिकमधील कामगार हे फक्त आमच्या कंपनीचे आधारस्तंभ नाहीत, तर ते उद्योगाचा आत्मा आहेत. या कराराद्वारे आम्ही फक्त पगारवाढ देत नाही, तर कामगारांच्या जीवनमानात खऱ्या अर्थाने सुधारणा घडवून आणत आहोत. रजा, बोनस, आरोग्य सुरक्षा आणि उत्पादन वृद्धी यासारख्या सर्व बाबींचा विचार करून हा करार करण्यात आला आहे. आम्ही विश्वास ठेवतो की कामगार जेवढे सुरक्षित, संतुष्ट आणि प्रोत्साहित असतील, तितकेच कंपनीचे यश अधिक दृढ होईल. आमचा उद्देश आहे की प्रत्येक कामगाराला न्याय मिळावा, त्यांना त्यांच्या मेहनत आणि योगदानाची खरी कदर होईल, आणि हा करार त्याच दृष्टीने इतिहासात एक ठळक उदाहरण बनेल.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# महानगरपालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापतींची निवडणूक संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध समितींच्या सभापतीपदाची निवडणूक आज पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे संपन्न झाली. यामध्ये विधी समिती सभापतीपदी सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी राणी पठारे, शहर सुधारणा समिती सभापतीपदी संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापतीपदी कैलास कुटे आणि शिक्षण समिती सभापतीपदी रविना आंगोळकर यांची निवड झाली आहे.**




### विशेष समितींच्या सभांचे वार

- विधी समिती - १ व ३ रा शुक्रवार, दुपारी ३ वाजता
- महिला व बालकल्याण समिती - २ व ४ था गुरुवार, दुपारी २.३० वाजता
- शहर सुधारणा समिती - २ व ४ था मंगळवार, दुपारी २ वाजता
- क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती - २ व ४ था शुक्रवार, दुपारी २.३० वाजता
- शिक्षण समिती - १ व ३ रा गुरुवार, दुपारी २.३० वाजता.

महापालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापती पदी निवड करण्यासाठी आज त्या त्या समितीची विशेष सभा पार पडली. या सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी कामकाज पाहिले.

नवनिर्वाचित सभापतींना पिठासीन अधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह नगरसदस्य व नगरसदस्या उपस्थित होते. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले.

तर, विधी समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य ज्ञानेश्वर जगताप, कुंदा भिसे, कुशाग्र कदम, शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, महिला व बालकल्याण समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य पल्लवी जगताप, निता पाडाळे, रेश्मा भुजबळ, शिवानी नरळे, सुप्रिया चांदगुडे, निकिता कदम, सारिका मासूळकर, शहर सुधारणा समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य अर्चना सस्ते, कुणाल वाव्हळकर, उत्तमराव केंदळे, अनंत कोऱ्हाळे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य शाम जगताप, तानाजी बारणे, धर्मपाल तंतरपाळे, योगेश लांडगे, जितेंद्र ननवरे आणि शिक्षण समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य पल्लवी वाल्हेकर, कविता भोंगाळे, रिटा सानप, सारिका बोऱ्हाडे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे उपस्थित होते.



**भूमिका**

# पाकिस्तानच्या अंगलट आलेले धोरण

**पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातील तालिबान यांच्यातील वाढता संघर्ष हा दक्षिण आशियातील सुरक्षेसाठी अत्यंत गंभीर आणि दूरगामी परिणाम करणारा ठरत आहे. एकेकाळी पाकिस्तानच्या INTER-SERVICES INTELLIGENCE (आयएसआय) च्या पाठबळावर उभे राहिलेले तालिबान आज इस्लामाबादच्या नियंत्रणाबाहेर गेले आहेत.**



१५ ऑगस्ट २०२१ रोजी अफगाणिस्तानवर पूर्ण सत्ता प्रस्थापित केल्यानंतर तालिबानने स्वतंत्र धोरण स्वीकारले. पाकिस्तानला अपेक्षा होती की तालिबान त्याच्या धोरणात्मक हितसंबंधांना पूरक ठरेल; मात्र वास्तवात परिस्थिती पूर्णतः बदलली.

तालिबानने पाकिस्तानविरोधी TEHRIK-I-TALIBAN PAKISTAN (टीटीपी)च्या अतिरेक्यांची तुरुंगातून सुटका केली. त्यानंतर टीटीपीने खैबर-पख्तुनख्वा आणि सीमाभागात पाकिस्तानी लष्करावर तसेच पोलिस ठाण्यांवर हल्ल्यांची मालिका सुरू केली. आत्मघातकी हल्ले, स्फोट आणि घातपातामुळे पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. पाकिस्तानला अपेक्षित असलेला ‘रणनीतिक लाभ’ उलट त्याच्यासाठी सुरक्षेचे मोठे संकट ठरला आहे. टीटीपी आणि अफगाण तालिबान यांची विचारसरणी जवळपास समान आहे. दोन्ही संघटनांमध्ये पश्तुन घटक मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सीमापार हालचाली रोखणे कठीण ठरले आहे.

अलीकडील काळात दोन्ही देशांमध्ये थेट लष्करी तणाव वाढताना दिसत आहे. पाकिस्तानने अफगाणिस्तानातील नानगरहार, खोस्त आणि पाक्तिका भागात दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केल्याचा दावा केला. या कारवायांत टीटीपी आणि इस्लामिक स्टेटशी संबंधित अड्डे उद्ध्वस्त केल्याचे पाकिस्तानचे म्हणणे आहे. मात्र अफगाण प्रशासनाने या हल्ल्यांत निरपराध महिला व लहान मुलांचे बळी गेल्याचा आरोप केला. प्रत्युत्तरादाखल अफगाण बाजूने पाकिस्तानातील काही लष्करी चौक्यांवर ड्रोनद्वारे हल्ले केल्याचा दावा करण्यात आला. या परस्पर कारवायांमुळे दोन्ही देशांतील सैनिक आणि सामान्य नागरिकांचे जीव गेले असून सीमाभागात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संघर्षामागे ‘ड्युरंड रेषा’ हा ऐतिहासिक सीमावादही महत्त्वाचा घटक आहे. १८९३ मध्ये आखलेली ही २,६४० किलोमीटर लांबीची सीमा ब्रिटिश भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात विभागणी करण्यासाठी निश्चित करण्यात आली होती. पाकिस्तान अस्तित्वात आल्यानंतर तीच रेषा पाकिस्तान-अफगाणिस्तान सीमा ठरली. मात्र अफगाणिस्तानने ही सीमा औपचारिकरीत्या कधीच मान्य केलेली नाही. या रेषेमुळे पश्तुन समाज दोन देशांत विभागला गेला आहे. त्यामुळे सीमाभागात कायम असंतोष आणि अविश्वास राहिला आहे.

काही वर्षांपूर्वी पाकिस्तानला वाटत होते की तालिबानचा वापर भारतविरोधी धोरणासाठी करता येईल. परंतु तालिबानने सत्तेवर आल्यानंतर स्वतःची स्वतंत्र भूमिका घेतली आणि विविध देशांशी संवाद सुरू केला. त्यामुळे पाकिस्तानच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. उलट, दहशतवादाला आश्रय देण्याचे दुष्परिणाम आता पाकिस्तानलाच भोगावे लागत आहेत.

दहशतवादी संघटना कोणाच्याही कायमस्वरूपी नियंत्रणात राहत नाहीत, हे या घटनाक्रमातून स्पष्ट झाले आहे. प्रादेशिक स्थैर्य राखण्यासाठी दोन्ही देशांनी लष्करी संघर्षाऐवजी संवाद, परस्पर विश्वास आणि राजनैतिक तोडगा यांचा मार्ग स्वीकारणे अत्यावश्यक आहे. अन्यथा हा वाढता तणाव व्यापक युद्धात परिवर्तित होण्याची शक्यता नाकारता येणार नाही आणि त्याचे परिणाम संपूर्ण दक्षिण आशियाला भोगावे लागतील.

## प्रासंगिक »

### साप आणि करवत

***एकदा एक साप सुतारकामाच्या वर्कशॉपमध्ये शिरला. वळवळत जाताना तो करवतीला घासला गेला आणि त्याला हलकी जखम झाली. रागाच्या भरात त्याने करवतीला चावा घेतला, पण त्यामुळे त्याचेच तोंड आणि दात जखमी झाले.***

तरीही त्याने समज करून घेतला की करवतीनेच त्याच्यावर हल्ला केला आहे. सूडाने पेटून त्याने करवतीला घट्ट विळखा घातला आणि पूर्ण ताकद लावली; मात्र त्यामुळे त्यालाच गंभीर जखमा झाल्या आणि तो मरण पावला. या कथेतून आपल्याला समजते की रागाच्या भरात दिलेली प्रतिक्रिया अनेकदा आपलेच नुकसान करते. परिस्थिती, लोकांचे बोलणे किंवा वागणे याकडे कधी कधी दुर्लक्ष करणेच योग्य असते. प्रत्येक वेळी प्रत्युत्तर देणे गरजेचे नसते. शांतता आणि संयम यामुळे पुढील मोठे नुकसान टाळता येते. द्वेषाऐवजी प्रेम आणि समजूतदारपणा ठेवला तर आयुष्य अधिक सुरक्षित आणि आनंदी राहते.

तात्पर्य : रागाच्या भरात दिलेली प्रतिक्रिया अनेकदा इतरांपेक्षा आपलेच जास्त नुकसान करते. काही वेळा शांत राहणे आणि दुर्लक्ष करणे हेच खरे शहाणपण असते.

जगातील भू-राजकारण पुन्हा एका धोकादायक वळणावर आले आहे. स्वतःला ‘शांतातदूत’ म्हणवून घेणारे Donald Trump आणि इस्रायलचे पंतप्रधान Benjamin Netanyahu यांच्या आक्रमक भूमिकेमुळे मध्यपूर्वेत तणाव भडकला आहे.

# वाटते तितकी ही लढाई सोपी नाही...

इराणच्या अणु कार्यक्रमावरून चर्चा फिस्कटल्यानंतर इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर हल्ले केल्याचे वृत्त समोर आले. या कारवाईचे लक्ष्य इराणचे सर्वोच्च नेते Ali Khamenei असल्याचे मानले जाते.

१९८९ पासून इराणच्या राजकारणावर प्रभावी नियंत्रण ठेवणाऱ्या खामेनेई यांनी ‘विलायत-ए-फकीह’ या तत्त्वाच्या आधारे धार्मिक व राजकीय सत्ता एकवटली. अमेरिकाविरोधी आणि इस्रायलविरोधी भूमिका त्यांनी सातत्याने घेतली. त्यांच्या नेतृत्वाखाली इराणने अणू कार्यक्रम पुढे नेला आणि लेबनॉन, सीरिया, इराक व येमेनमध्ये प्रभाव वाढवला. अमेरिकेच्या मते, इराण अण्वस्त्रसज्ज झाल्यास जागतिक सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होईल. काही पाश्चात्त्य देश या भूमिकेला पाठिंबा देतात; तर रशिया, चीन आणि इतर राष्ट्रे वेगळी भूमिका घेतात. त्यामुळे जग स्पष्टपणे



विभागले गेले आहे.

खामेनेई यांच्या संभाव्य मृत्यूची बातमी केवळ एका नेत्याच्या अंताची नसून, ती संपूर्ण प्रदेशातील संतुलन बिघडवू शकते. इराणमध्ये सर्वोच्च नेता हा केवळ राजकीय प्रमुख नसून धार्मिक प्रतीकही असतो. अशा परिस्थितीत संतापाची लाट उसळल्यास इस्रायलविरोधी प्रतिहल्ले, क्षेपणास्त्र मारा किंवा प्रादेशिक सहयोगी संघटनांची सक्रियता वाढू शकते. Hezbollah, Hamas किंवा इराणसमर्थक मिलिशिया सक्रिय झाल्यास संघर्ष व्यापक युद्धात परिवर्तित होण्याची शक्यता आहे.

तंत्रज्ञान, सायबरयुद्ध, ड्रोन आणि प्रॉक्सी लढाया यामुळे युद्धाचे स्वरूप बदलले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या ‘पोस्ट-ट्रुथ’ युगात अफवा आणि प्रचारयुद्धही तितकेच प्रभावी ठरतात. त्यामुळे कोणतीही बातमी स्वीकारताना सावधगिरी आवश्यक आहे. खामेनेई हुकूमशहा असले, तरी लोकशाहीच्या नावाखाली बाह्य हस्तक्षेप करणे कितपत योग्य, हा प्रश्न उपस्थित होतो. तेलसंपत्ती, सामरिक वर्चस्व आणि प्रादेशिक प्रभाव यासाठी सुरू असलेली ही चढाओढ जगाला नव्या अस्थिरतेकडे नेत आहे. ही परिस्थिती वाटते तेवढी सोपी नाही; उलट ती जागतिक संघर्षाची ठिणगी ठरू शकते.

## ।। अभंगवाणी ।।



।। नाम साराचेही सार। शरणागत यमकिंकर ।।१

।। उत्तमा उत्तम। वाचे बोला पुरुषोत्तम ।।२

।। नाम जपता चंद्रमौळी। नामे तरला वाल्हाकोळी ।।३।।

तुका म्हणे वर्ण काय। तारक विठोबाचे पाय ।।४।।

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दारूगोळा कंपन्यांच्या नियमांत बदलासाठी केंद्राकडे शिफारस; मुख्यमंत्र्यांची घोषणा

## काटोल येथील भीषण दुर्घटनेनंतर नियमावलीत तातडीने बदल करण्याचा निर्णय

**महाईन्यूज । नागपूर**

**नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यात राऊळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड कंपनीत आता झालेला स्फोट तसेच मागील काळात घडलेल्या घटना बघता संपूर्ण प्रक्रियेकडे पुनरावलोकन करून बघण्याची गरज आहे.**




दारुगोळा कंपन्यांबाबत जे कायदे आहेत, ते केंद्र सरकारच्याअंतर्गत येते. राज्याच्या वतीने या कायद्यात काय बदल केला पाहिजे, प्रक्रियेत काय बदल केले पाहिजे याबाबत अभ्यासपूर्ण अहवाल तयार करून केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल. आताच्या प्रक्रियेत बदल घडवण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी नागपुरात प्रसारमाध्यमासोबत बोलताना सांगितले.

काटोल तालुक्यातील राऊळगाव येथे रविवारी सकाळी एसबीएल एनर्जी लिमिटेड या बारूद आणि डेटोनेटर (विस्फोटक साहित्य) तयार करणाऱ्या कंपनीच्या डिटोनेटर पॅकिंग युनिटमध्ये भीषण स्फोट झाला. यात १९ जणांचा मृत्यू झाला. १७ जखमींवर उपचार सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी त्यांच्या उपचाराबाबत ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये जाऊन पाहणी केली. त्यानंतर ते प्रसारमाध्यमासोबत बोलत होते.

जखमींची प्रकृती गंभीरच आहे. ऑरेंज सिटी हॉस्पिटल व्यवस्थापनाने शर्थीचे प्रयत्न करून उत्तम उपचार दिले आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार पुढील बराच गंभीर जखमी कामगारांवर उपचार करावे लागणार आहे. अशा प्रकरणात तीन आठवड्यानंतरही संसर्ग किंवा अडचणी निर्माण होऊ शकतात. सर्वोत्तम उपचार देण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकरणात पोलिसांनी २१ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

व्यवस्थापकीय संचालकासह ११ जणांना अटक केली आहे. काही लोक फरार आहेत, त्यांचा शोध घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कंपनीच्या वतीने मृतकांच्या कुटुंबीयांना ७५ लाख रुपये दिले आहे. मुख्यमंत्री निधीतून ५ लाख व पंतप्रधान निधीतून २ लाख रुपये दिलेले आहेत. जखमीसाठी कंपनीने २५ लाख रुपये दिले आहे. परंतु आता तसेच मागील काळात घडलेल्या घटना बघता संपूर्ण प्रक्रियेकडे पुनरावलोकन करून बघण्याची गरज आहे. या कंपन्यांमध्ये तीव्र ज्वलनशील रसायन आहेत. एखादा रसायन भरलेला डबा खाली पडला तरी स्फोट होऊ शकतो. त्यामुळे यातील काही बाबी मनुष्यरहित करता येतील का, या दृष्टीने लक्ष दिले गेले पाहिजे.

काही ठिकाणी कामगार आवश्यक आहे. परंतु अति ज्वलनशील रसायनाबाबत स्वयंचलित प्रणाली वापरता येईल का, याचाही पुढच्या काळात विचार करावा लागेल. याबाबतही अहवाल केंद्राला पाठवणार आहोत. २००८ मधील नियमही जुने झाले आहेत. तंत्रज्ञान बदलले आहे, रसायनाची ज्वलनशीलता वाढली आहे. त्यामुळे नवीन नियम तयार करण्यात आले पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न देखील करणार असल्याचे ते म्हणाले.

### दोषींना सोडणार नाही

पेसोकडून नियंत्रणाकडे दुर्लक्षबाबत आताच बोलता येणार नाही. तसा अहवाल नाही. परंतु 'पेसो'ला आपले नियम बदलण्याची गरज निश्चितच आहे. हे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात जीवहानी होणे, ही गंभीर बाब असून चौकशी केली जात आहे. दोषींना सोडले जाणार नाही. कारवाई तर होईलच, परंतु भविष्यात अशा घटना होणार नाही, या दृष्टीने अधिक लक्ष देण्यात येईल. मागील घटनेनंतर दारूगोळा तयार करणाऱ्या कंपन्याचे अंकेक्षण करण्यात आले आहे. अंकेक्षणात सुरक्षा उपायावर भर दिला जाते. परंतु कुणाकडूनही चूक होणार नाही, त्यासाठी नव्याने नियम तयार करावे लागतील, असे ते म्हणाले.

---

# इ-चलान रद्दबाबत सरकार सकारात्मक; आंदोलन मागे घेण्याचे आवाहन

**महाईन्यूज । मुंबई**

**अन्यायकारक इ-चलान रद्द करण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल, त्याचबरोबर वाहतूकदारांच्या अन्य समस्या सोडण्यासाठी येत्या ५ तारखेला परिवहन आयुक्तांच्या सोबत पोलीस प्रशासन व वाहतूकदारांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक बोलवली असून या बैठकीत त्यांच्या मागण्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. पण येत्या ५ तारखेपासून राज्यातील विविध वाहतूक संघटनांनी पुकारलेले आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.**



याच विषयावर बोलावलेल्या राज्यातील विविध वाहतूकदार संघटनांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर संबंधित पोलीस प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, इ-चलनाच्या संदर्भात वाहतूकदारांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. पार्किंगमध्ये असलेल्या वाहनांच्यावर आकस बुद्धीने इ-चलान काढले जातात. तसेच प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्याऐवजी त्यांची अनुमती न घेता काही कर्मचारी इ-चलान काढतात. हे अन्यायकारक आहे.

याबाबत संबंधित यंत्रणेला कडक सूचना दिल्या असून यापुढे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यानेच इ-चलानची कारवाई करावी, असे निर्देश दिले आहेत. तसेच अन्यायकारकरीत्या यापूर्वी केलेल्या इ-चलान रद्द करण्याबाबत सरकार सकारात्मक असून येत्या ५ तारखेला परिवहन आयुक्तांच्या सोबत पोलीस प्रशासन व वाहतूकदार संघटनेचे प्रतिनिधी बसून आपल्या समस्या सोडवाव्यात तोपर्यंत आपले आंदोलन स्थगित करावे असे आवाहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले.

# “युद्धाची सुरुवात तुम्ही केली, शेवट आम्ही करू”

## इराणला इशारा देत अमेरिकेने सांगितली हल्ल्यामागची उद्दिष्ट्ये...

**महाईन्यूज । अमेरिका**

**इराणने गेल्या अनेक वर्षांपासून जगभरातील अमेरिकन सैन्य आणि हितसंबंधांना लक्ष्य केले आहे, त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिका आणि इस्रायलने इराणविरोधात कारवाई केली आहे. २८ जानेवारीपासून अमेरिका आणि इस्रायलने संयक्तपणे इराणवर हल्ले चढवले. मात्र, हे हल्ले करण्यामागे इराणचे वेळकाढू धोरण असल्याची टीका अमेरिकेने केली आहे. त्यामुळे, “आम्ही हे युद्ध सुरू केले नाही, परंतु राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली आम्ही ते संपवू”, असं विधान अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी सोमवारी केलं.**



शनिवारपासून सुरू झालेल्या या लष्करी कारवाईनंतर प्रशासनाने पहिल्यांदाच जाहीरपणे पत्रकारांशी संवाद साधला. या संघर्षात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांचा मृत्यू झाला असून, मध्यपूर्वेतील इतर देशही या युद्धात ओढले गेले आहेत. कुवेतमध्ये या संघर्षात आतापर्यंत चार अमेरिकन सैनिकांचा मृत्यू झाला आहे. “हा ‘सत्तापालट’ करण्यासाठी केलेला संघर्ष नाही, पण इराणची सत्ता नक्कीच बदलली आहे आणि जग आता अधिक सुरक्षित आहे,” असेही हेगसेथ यांनी नमूद केले.

इराणने केवळ विनाशच पसरवला : “आज, त्यांच्या हताशपणामुळे शत्रूचा खरा चेहरा उघड झाला आहे; इराणची क्षेपणास्त्रे आणि ड्रोन त्यांच्या शेजारील देशांतील हॉटेल्स, विमानतळ, अपार्टमेंट्स आणि इतर नागरी लक्ष्यांवर अंदाधुंदपणे कोसळत आहेत. दशकांपासून भ्याड दहशतवादी कारवायांमध्ये गुंतलेल्या राजवटीकडून आलेल्या या भ्याड युक्त्या आजही केवळ मृत्यू आणि विनाशच पसरवत आहेत”, असं हेगसेथ म्हणाले.

“इराणच्या नेतृत्वाने दहशतवादी गट, क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि खोलवर गाडलेले अण्वस्त्र कारखाने व सुविधांशिवाय काहीही निर्माण केलेले नाही. गेल्या जूनमध्ये, ‘ऑपरेशन मिडनाईट हॅमर’ने त्यांच्या अण्वस्त्र कार्यक्रमाची पूर्णपणे राखरांगोळी केली. त्यानंतर, आम्ही त्यांना स्पष्टपणे सांगितले होते की, आता बस झाले, आता करार करा. त्यांनी अहंकाराने नकार दिला. आम्ही त्यांना आधी इशारा दिला होता की यावेळी परिस्थिती अधिक भीषण असेल. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, सचिव रुबिओ त्यांनी खऱ्या मुत्सद्देगिरीसाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले, शांततेचा मार्ग वारंवार खुला करून दिला. त्यांनी शांततेसाठी प्रामाणिकपणे वारंवार प्रयत्न केले. शांततापूर्ण आणि समंजस करार करण्याची प्रत्येक संधी होती. पण तेहरान वाटाघाटी करत नव्हते. ते केवळ वेळकाढूपणा करत होते. त्यांचा उद्देश आपल्या क्षेपणास्त्रांचा साठा पुन्हा भरण्यासाठी आणि त्यांच्या अण्वस्त्र महत्त्वाकांक्षेला पुन्हा सुरुवात करण्यासाठी वेळ विकत घेणे हा होता. त्यांचे ध्येय आपल्याला ओलीस धरून ठेवणे आणि आपल्या सैन्यावर हल्ला करण्याची धमकी देणे हे होते. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प असले खेळ खेळत नाहीत”, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

### आमची उद्दीष्ट्ये ठरलेली आहेत

‘ऑपरेशन एपिक फ्युरी’चे ध्येय लेझरसारखे अचूक आणि केंद्रित आहे. इराणची आक्रमक क्षेपणास्त्रे नष्ट करणे, त्यांच्या क्षेपणास्त्र उत्पादनाचा नायनाट करणे, त्यांचे नौदल आणि इतर सुरक्षा पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करणे. जेणेकरून त्यांच्याकडे कधीही अण्वस्त्रे नसतील. आम्ही त्यांच्यावर अत्यंत अचूकपणे, जबरदस्त आणि कोणताही संकोच न बाळगता प्रहार करत आहोत. प्रत्येक सरत्या दिवसासोबत आमची क्षमता अधिक शक्तिशाली होत आहे आणि इराण कमकुवत होत आहे. या युद्धाच्या अटी आम्ही निश्चित केल्या आहेत. आमच्या महत्त्वाकांक्षा काल्पनिक नाहीत; त्या वास्तववादी आहेत. जनतेबद्दल बोलायचे झाले तर, आम्हाला आशा आहे की इराणची जनता या सुवर्णसंधीचा फायदा घेईल. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे, आता वेळ तुमची आहे, असंही हेगसेथ म्हणाले.

### युद्धाचा शेवट आम्ही करू

“आम्ही हे युद्ध सुरू केले नाही, परंतु राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली आम्ही ते संपवणार आहोत. अमेरिकन नागरिकांविरुद्ध त्यांनी पुकारलेल्या युद्धाचा बदला आता आम्ही घेत आहोत. इराणच्या ४७ वर्षांच्या उद्दामपणाला चाप लावण्यासाठी ४७ व्या राष्ट्राध्यक्षांची (डोनाल्ड ट्रम्प) गरज भासली, ज्यांनी नेहमीच ‘अमेरिका फर्स्ट’ला प्राध्यान्य दिले आहे,” अशा शब्दांत अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी इराणला इशारा दिला. हेगसेथ यांनी पुढे अत्यंत कठोर शब्दात बजावले की, “जर तुम्ही अमेरिकन नागरिकांना मारले, किंवा पृथ्वीवर कुठेही त्यांना धोका निर्माण केला, तर आम्ही कोणतीही माफी न मागता आणि कोणताही संकोच न करता तुमचा शोध घेऊ आणि तुम्हाला ठार मारू.”

---

# इस्रायल-अमेरिकेच्या हल्ल्यात संपूर्ण कुटुंब ठार झाल्याची शक्यता!

**महाईन्यूज । अमेरिका**

**इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या पत्नी मन्सुरेह खोजस्ते बागेरजादेह यांचाही अमेरिका-इस्रायली हल्ल्यात मृत्यू झाला आहे. इराणचे अधिकृत प्रसारक ‘प्रेस टीव्ही’ने सोमवारी याबाबत माहिती दिली. अमेरिका आणि इस्रायलने शनिवारी केलेल्या हल्ल्यात खामेनी मारले गेले होते. इराणी सरकारी माध्यमांच्या वृत्तानुसार, खोजस्ते याच हल्ल्यांच्या मालिकेत जखमी झाल्या होत्या आणि नंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.**



इराणी सरकारी माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, अयातुल्ला खामेनी हल्ल्याच्या पहिल्या टप्प्यातच मारले गेले. अमेरिका आणि इस्रायली अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हे हल्ले धोरणात्मक लष्करी आणि सुरक्षा तळांना लक्ष्य करून करण्यात आले होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तापालटाच्या व्यापक प्रयत्नांचा भाग म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या मृत्यूची माहिती दिली होती.


दरम्यान, अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात खामेनी यांच्या कुटुंबातील अनेक सदस्य, त्यांची मुलगी, जावई आणि नात यांचाही मृत्यू झाला आहे. यंग जर्नलिस्ट क्लबच्या माध्यमातून ‘रॉयटर्स’ने तेहरान महानगरपालिकेच्या एका सदस्याने यापूर्वीच सर्वोच्च नेत्याच्या विस्तारित कुटुंबातील मृत्यूच्या वृत्ताला दुजोरा दिला होता.

खामेनी यांच्या मृत्यूनंतर अयातुल्ला अली रझा अराफी यांची इराणच्या नेतृत्व मंडळात न्यायिक सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. खामेनी यांच्यानंतर नवे नेतृत्व नियुक्त होईपर्यंत ते हंगामी कारभार सांभाळतील. ‘आयएसएनए’ या वृत्तसंस्थेने ही माहिती दिली. इराणच्या नव्या नेतृत्वाने चर्चा करण्याची तयारी दर्शवल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. ही चर्चा तातडीने व्हायला हवी अशी अपेक्षा ट्रम्प यांनी अटलांटिक नियतकालिकाला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केली. मात्र ही चर्चा कुणाशी आणि केव्हा होणार हे ट्रम्प यांनी स्पष्ट केले नाही.

# 'गली बॉय'ची अभिनेत्री स्पिरिट'मध्ये




स्पिरिट चित्रपटाच्या टीमने नुकतेच संदीप रेड्डी वांगाचा चित्रपटाचे नवे पोस्टर रिलीज केले आहे. ज्यामध्ये विवेक ओबेरॉयचा फर्स्ट लूक व्हायरल झाला आहे. प्रभास आणि तृप्ती डिमरी स्टारर या चित्रपटात दुसरी अभिनेत्री आहे-ऐश्वर्या देसाई, जी महत्त्वाच्या भूमिकेत आहे. प्रभास एक कॉपच्या भूमिकेत असेल. स्पिरिट चित्रपट ५ मार्च, २०२७ रोजी रिलीज होणार आहे. ऐश्वर्या देसाई एक इंडियन-अमेरिकन अभिनेत्री आहे. तिने इन्स्टाग्राम बायोवर दिलेल्या माहितीनुसार, मॉडल आणि कंटेंट क्रिएटर आहे. ती ब्युटी आणि लाईफस्टाईल कंटेंट बनवते. याआधी ती रणवीर सिंहचा चित्रपट 'गली बॉय'मध्ये छोट्याशा भूमिकेत दिसली होती. शॉर्ट थ्रिलर चित्रपट 'रॅट इन द किचन'सह अनेक चित्रपटांमध्ये ती दिसली. आता तिला संदीप रेड्डी वांगा चा मोठा चित्रपट स्पिरिट मिळाला आहे. तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर तिचे चाळीस हाजरहून अधिक फॉलोअर्स आहेत. रिपोर्टनुसार, ती मुंबईत राहते. जारी केलेल्या नव्या पोस्टरमध्ये ऐश्वर्या देसाई देखील दिसते. ती एका टेबल समोर बसलेली दिसते. विवेक ओबेरॉय एक क्राईम बॉसच्या भूमिकेत असेल. त्याने कॅज्युअल व्हाईट शर्ट, गॉगल्स घातले आहेत. त्याच्या ओठात सिगारेट दिसत आहे. त्याने कॅप्शनमध्ये लिहिलंय - "अंधारात लपलेले एक रहस्य आणि सर्वात खोल रहस्ये लक्षात ठेवणारे डोळे. ५ मार्च २०२७ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये."



## तृप्ती डिमरी उद्योगपतीच्या प्रेमात?

बॉलिवूड अभिनेत्री तृप्ती डिमरीने अल्पावधीतच आपल्या अभिनयाने मोठे यश संपादन केले आहे. तिचा क्युट अंदाज अनेकांचे लक्ष वेधून घेतो. ती सोशल मीडियावर देखील सक्रिय असल्याचे पाहायला मिळते.आपल्या दैनंदिन आयुष्यात घडत असलेल्या घडामोडी तीचाहत्यांसोबत कायम शेअर करत असते. मात्र नुकतेच तिने शेअर केलेल्या एका पोस्टमुळे तिच्या रिलेशनशिपच्या चर्चांना उधाण आले आहे.तृप्ती डिमरीनं तिच्या वाढदिवसाचे खास फोटो सोशल मीडियात शेअर केले होते. तिच्या बर्थ डे पार्टीसाठी कुटुंबासह बच्चे कंपनी देखील पाहायला मिळाली. मात्र तृप्तीच्या पोस्टमधील एका खास फोटोने लक्ष वेधून घेतलं आहे. तिच्या पोस्टमध्ये तिचा कथित बॉयफ्रेंड सॅम मर्चंट देखील दिसत आहे. दोघांनी फोटोसाठी एकत्र पोज दिले आहे. दोघांचा हा फोटो सोशल मीडियात तुफान व्हायरल होत आहे. यावरून तृप्ती प्रेमात पडली का? असा सवाल नेटकऱ्यांकडून केला जात आहे.दरम्यान, तृप्ती आणि सॅम बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा आहेत. ते अनेकदा एकत्र दिसतात. मात्र दोघांनी अद्याप अधिकृतपणे त्यांच्या नात्याची घोषणा केलेली नाही. तृप्तीचा कथित बॉयफ्रेंड सॅम एक मॉडेल असून, त्याने अनेक प्रॉजेक्टसाठी काम केलं आहे. सध्या तो बिझनेसमध्ये सक्रिय असून, तो काही रेस्टॉरंटचा मालक आहे.



## 'स्पायडर मॅन' कपलच्या लग्नाच्या चर्चांना उधाण

हॉलिवूडमधील 'स्पायडर-मॅन' जोडी टॉम हॉलेंड आणि झेंडाया यांची लग्नाच्या चर्चांना पुन्हा एकदा गती मिळाली आहे. त्यांच्या स्टायलिस्ट लॉ रॉचने एका रेड कार्पेटवर एका बातचीतमध्ये सांगितले की, "विवाह आधीच झाला आहे, तुम्ही चुकलात!" तो म्हणाला की ही गोष्ट "खरोखरच खरी" आहे, ज्यामुळे चाहत्यांमध्ये विवाहाची चर्चा जोरात सुरू झाली आहे.हॉलिवूडमधील प्रसिद्ध कपल अभिनेता टॉम हॉलेंड आणि अभिनेत्री झेंडाया यांनी लग्न केल्याची चर्चा सुरु आहे. लग्न झाले असतानाही हॉलिवूडला याबद्द कसे कळले नाही, असा प्रश्नदेखील काही जण विचारताहेत.'स्पायडर मॅन' फेम स्टार कपल अभिनेता टॉम हॉलेंड आणि अभिनेत्री झेंडाया यांनी गुपपूच साखरपुडा उरकला होता.

झेंडायाच्या हातात डायमंड रिंग पाहिल्यानंतर त्यांचा साखरपुडा झाल्याचे वृत्त समोर आले. टॉम आणि झेंडाया बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत होते. अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथे ८२ वा गोल्डन ग्लोब पुरस्कार सोहळ्यात झेंडायाच्या हातात डायमंड रिंग दिसली होती. आता दोघांनी लग्न केल्याची चर्चा सुरु आहे. दरम्यान, या गोष्टीचे खंडन देखील या कपलने केलेले नाही वा स्वीकारलेले देखील नाही.

मीडिया रिपोर्टनुसार, तिच्या डाव्या हातात एक प्लेन गोल्ड बँड दिसला. त्यानंतर सोशल मीडियावर त्यांच्या लग्नाची चर्चा सुरु झाली.२०२६ ॲक्टर ॲवार्ईसमध्ये, झेंडायाचा जवळचा मित्र आणि स्टायलिस्ट लॉ रोच रेड कार्पेटवर बातचीत करत होता. तेव्हा झेंडायाच्या लग्नाची चर्चा झाली. यावर रोच म्हमाला की, लग्न आधीच झाले आहे. हे खरं आहे का, असे रोचला विचारल्यानंतर तो हसला आणि म्हणाला की, हो हे खरं आहे. रिपोर्ट्सनुसार, झेंडाया-टॉम हॉलेंड दोघांच्या रिप्रेझेंटेटिव्सने हे वृत्त न अफवा असल्याचं सांगितलं अन् न नकार दिला.

## "बॉलिवूडमध्ये हीरोच ठरवतो हीरोइन?"



बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नू हिने अलीकडील एका मुलाखतीत चित्रपटसृष्टीतील कास्टिंगच्या वास्तवावर स्पष्ट आणि बेधडक भाष्य केले आहे. अनेकदा चित्रपटात कोणती अभिनेत्री काम करणार हे दिग्दर्शक किंवा निर्माते नव्हे, तर मुख्य अभिनेता ठरवतो, असा खुलासा तिने केला आहे. तिच्या या वक्तव्यामुळे इंडस्ट्रीतील पडद्यामागील राजकारण पुन्हा चर्चेत आले आहे.तापसी नुकतीच 'अस्सी' या चित्रपटात दिसली. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारसा यशस्वी ठरला नसला, तरी तिच्या अभिनयाचे कौतुक झाले. स्त्रीप्रधान चित्रपट आणि ठाम मतांसाठी ओळखली जाणारी तापसी म्हणाली की, तिला काही चित्रपट केवळ मुख्य अभिनेत्याच्या पसंतीमुळे गमवावे लागले.ती म्हणाली, "मला थेट कोणी सांगत नाही की मला तुमच्यासोबत काम करायचे नाही. पण नंतर कळते की हिरोला दुसरी कोणीतरी अभिनेत्री हवी होती. अनेक वेळा निर्णय हिरोच घेतो." तिच्या मते, बॉलिवूडमध्ये हिरोची स्टार पॉवर आणि प्रभाव मोठा असतो. त्यामुळे कास्टिंगमध्ये त्याचा मोठा वाटा असतो. तापसीने उदाहरण देताना डंकी या चित्रपटाचा उल्लेख केला. या चित्रपटात तिने शाहरुख खान यांच्यासोबत काम केले. ती म्हणाली की, दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांनी तिला या भूमिकेसाठी निवडले. "मी शाहरुख सर यांच्या नेहमीच्या ऑनस्क्रीन सर्किटचा भाग नव्हते. त्यामुळे माझी निवड अनेकांसाठी आश्चर्यकारक होती. पण दिग्दर्शकांना माझ्यावर विश्वास होता," असे तिने सांगितले. तिच्या या वक्तव्यातून हे स्पष्ट होते की, बॉलिवूडमध्ये केवळ टॅलेंट पुरेसे नसते. कधी कधी इंडस्ट्रीतील राजकारण, स्टार पॉवर आणि वैयक्तिक समीकरणेही महत्त्वाची ठरतात. तापसीने सांगितले की, अनेकदा अभिनेत्रीला चित्रपटातून बाहेर काढले जाते, पण त्यामागचे खरे कारण समोर येत नाही.तापसी पन्नूने नेहमीच वेगळ्या विषयांवरील चित्रपट निवडले आहेत.

# युद्धामुळं क्रीडाविश्व हादरलं!

## पीव्ही सिंधू दुबईत तर, भारतीय बास्केटबॉल संघ कतारमध्ये अडकला

**महाईन्यूज । मुंबई**

**इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर मध्यपूर्वेतील परिस्थिती अत्यंत गंभीर झाली. सुरक्षा कारणास्तव या भागातील हवाई क्षेत्र बंद करण्यात आल्याने आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक पूर्णपणे कोलमडली असून भारताची स्टार शटलर पीव्ही सिंधू दुबईत, तर भारतीय पुरुष बास्केटबॉल संघ कतारमध्ये अडकला आहे.**





दोनवेळा ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधू ३ मार्चपासून सुरू होणाऱ्या ऑल इंग्लंड ओपन स्पर्धेसाठी बर्मिंगहॅमला जात होती. दुबई हे तिचे ट्रान्झिट पॉइंट होते. मात्र, तिथे पोहोचताच युद्ध सुरू झाल्याने ती अडकून पडली. सिंधूने दुबई विमानतळाचा व्हिडिओ शेअर करत पुढील सूचना मिळेपर्यंत सर्व उड्डाणे निलंबित करण्यात आल्याचे सांगितले. मिळालेल्या माहितीनुसार, सिंधू विमानतळावर असतानाच जवळच एक स्फोट झाला, ज्यातून ती थोडक्यात बचावली. सध्या तिला सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले असले तरी, तिचे स्पर्धेत खेळणे आता अशक्य मानले जात आहे. केवळ सिंधूच नाही, तर भारताचा वरिष्ठ पुरुष बास्केटबॉल संघ देखील कतारची राजधानी दोहा येथे अडकला आहे. हा संघ 'एफआयबीए बास्केटबॉल विश्वचषक २०२७' च्या आशियाई पात्रता फेरीसाठी तिथे गेला होता. हवाई क्षेत्र बंद झाल्याने संघाचा पुढील प्रवास थांबला असून खेळाडूंच्या सुरक्षिततेची चिंता व्यक्त केली जात आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, दुबई आंतरराष्ट्रीय आणि अल मकतूम विमानतळावरील सर्व कामकाज पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात आले आहे. एमिरेट्स, फ्लायदुबई आणि एतिहाद एअरवेजने आपली सर्व उड्डाणे तात्पुरती स्थगित केली आहेत. भारतातून जाणारी आणि येणारी साधारण ३५० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. विमानतळ प्रशासनाने प्रवाशांना विमानतळावर न येण्याचे आवाहन केले आहे. विमानतळे बंद झाल्याने जागतिक स्तरावर प्रवाशांची मोठी कोंडी झाली आहे. अनेक भारतीय प्रवासी दुबई आणि अबू धाबी विमानतळावर अडकले असून त्यांना रिबुकिंगसाठी ताटकळत राहावे लागत आहे.

## टी-२० विश्वचषकातील खराब कामगिरीनंतर खेळाडूंवर दंडात्मक कारवाई!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**टी-२० विश्वचषक २०२६ मधून पाकिस्तान सुपर-८ टप्प्यातून बाहेर पडला. या स्पर्धेतील निराशाजनक कामगिरीचा परिणाम आता खेळाडूंना महागात पडणार आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) संघाच्या खराब कामगिरीविरुद्ध कठोर कारवाई केली आहे आणि प्रत्येक खेळाडूवर दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे. संघ स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर ही शिक्षा देण्यात आली. हा एक आश्चर्यकारक निर्णय मानला जात आहे.**



पाकिस्तानला गट टप्प्यात भारताकडून पराभवाला सामोरं जावं लागलं. त्याशिवाय संघाने गट टप्प्यातील तिन्ही सामने खेळले. याशिवाय सुपर-८ टप्प्यात पाकिस्तानने फक्त एक सामना जिंकला. या सामन्यातही पाकिस्तानने श्रीलंकेवर निसटता विजय मिळवला. २०० अधिक धावांचं लक्ष्य श्रीलंकेने जवळपास गाठलं होतं, पण अखेरीस पाकिस्तान जिंकला. पाकिस्तानला अखेरच्या सामन्यात गणितीय समीकरणांनुसार विजय मिळवल्यास सेमीफायनल गाठणं सहज शक्य होतं. पण संघ कमी पडला.

२०२६ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तान सुपर ८ टप्प्यातून बाहेर पडला. ही सलग चौथी आयसीसी स्पर्धा आहे, ज्यामध्ये पाकिस्तान उपांत्य फेरीत पोहोचू शकला नाही. यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला कारवाई करण्यास प्रवृत्त केलं. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पीसीबीने संघातील प्रत्येक खेळाडूला ५० लाख पाकिस्तानी रुपये (अंदाजे १६ लाख भारतीय रुपये) दंड ठोठावला जाणार आहे. हा दंड विश्वचषकात सहभागी झालेल्या संघातील सर्व सदस्यांना लागू आहे.

संघावर आधीच टीका होत असल्याने पीसीबीने दिलेली ही शिक्षा आणि रक्कम खेळाडूंसाठी मोठी गोष्ट असणार आहे. पीसीबी स्वतः दंड वसूल करेल, म्हणजेच खेळाडूंना त्यांच्या पगारातून, सामन्याच्या शुल्कातून किंवा इतर देयकांमधून कपात करावी लागेल. हे पाऊल पीसीबीच्या नवीन धोरणाचा एक भाग असल्याचे दिसते, जिथे कामगिरी थेट आर्थिक अटींशी जोडली जात आहे.

खराब कामगिरीसाठी पाकिस्तान क्रिकेटवर कारवाई होण्याची ही पहिलीच वेळ नाही, परंतु दंडाच्या रकमेमुळे ते अधिकच लक्ष वेधून घेत आहे. खराब कामगिरीसाठी खेळाडूंना असा दंड आकारणं बोर्डाकडून दुर्मिळ आहे.

पाकिस्तानने स्पर्धेतील त्यांचे सर्व सामने श्रीलंकेत खेळले, परंतु त्यांना स्पर्धेचा फायदा उठवता आला नाही. पाकिस्तानने नेदरलँड्सवर ३ विकेटने विजय मिळवून स्पर्धेची सुरुवात केली. पण, त्या सामन्यातही ते पराभवापासून थोडक्यात बचावले. त्यानंतर त्यांनी अमेरिकेविरुद्ध ३२ धावांनी विजय मिळवला, परंतु भारतीय संघाविरुद्ध ६१ धावांनी पराभव पत्करावा लागला. त्यानंतर ते कसे तरी सुपर ८ मध्ये पोहोचण्यात यशस्वी झाले.

सुपर ८ फेरीत पाकिस्तानची कामगिरी फारशी प्रभावी नव्हती. न्यूझीलंडविरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाला. त्यानंतर त्यांना इंग्लंडकडून २ विकेट्सनी पराभव पत्करावा लागला. त्यानंतर त्यांनी श्रीलंकेविरुद्ध विजय मिळवला, परंतु नेट रन रेटमुळे पुढील फेरीत प्रवेश मिळवू शकले नाहीत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। मंगळवार ।
दि. 03 मार्च 2026 ।

epaper.mahaenews.com


पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# माजी नगरसेविकेसह ४० जण दुबईत अडकले!

## कुटुंबियांमध्ये चिंतेचे वातावरण : युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबईतील विमानसेवा विस्कळीत

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील माजी नगरसेविका सुमन नेटके यांच्यासह सुमारे ४० ज्येष्ठ नागरिकांचा पर्यटनासाठी गेलेला ग्रुप सध्या दुबई येथे अडकला आहे. सांगवी परिसरातील गायकवाड कुटुंबातील सहा सदस्यांचाही या ग्रुपमध्ये समावेश आहे. अचानक निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबईतील विमानसेवा विस्कळीत झाली असून, भारताकडे येणारी उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.**





मिळालेल्या माहितीनुसार, हा ग्रुप २५ फेब्रुवारी रोजी पर्यटनासाठी दुबईला रवाना झाला होता. नियोजित वेळापत्रकानुसार आज त्यांचे भारतात परतण्याचे ठरले होते. मात्र सुरक्षा कारणास्तव विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आल्याने त्यांचा परतीचा प्रवास अनिश्चित झाला आहे.

सध्या सर्वजण सुरक्षित स्थळी थांबले असून स्थानिक प्रशासनाच्या सूचनांनुसार काळजी घेत आहेत. तरीही दुबईवरील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असल्याने त्यांच्या आरोग्याबाबतही नातेवाईक काळजी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुटकेसाठी भारत सरकार यांनी विशेष विमानांची व्यवस्था करावी, अशी मागणी कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू असून, लवकरात लवकर सुरक्षित परतीची व्यवस्था व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# राजमाता फार्मसी महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आंतरराष्ट्रीय परिषद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ फार्मसी, दुडुळगाव यांच्या वतीने व इरा कॉन्सलटन्सि अँड रिसर्च ऑर्गनायजेशन यांच्या सहकार्याने “संशोधनातील कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित डिजिटल परिवर्तन आणि साय-हबच्या पलीकडील नैतिक मुक्त ज्ञानप्रवेश” या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे उत्साहात आयोजन करण्यात आले. परिषदेला देश-विदेशातील तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



संस्थेचे संस्थापक व संचालक डॉ. अभय जे. गांधी हे औषध संशोधन, नैदानिक संशोधन व वैज्ञानिक लेखन क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली आयसीआरओ संस्था संशोधनातील कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल परिवर्तन व नैतिक ज्ञानप्रवेशाला चालना देत युवा संशोधकांना जागतिक स्तरावरील संधी उपलब्ध करून देत आहे.

परिषदेची सुरुवात ऑनलाइन तोंडी सादरीकरणांनी झाली. दुसऱ्या दिवशी (२८ फेब्रुवारी २०२६) उद्घाटन समारंभ पार पडला. डॉ. के. एस. लड्डा यांनी “हर्बल उत्पादनांच्या मानकीकरण व गुणवत्तानियंत्रणासाठी AI व केमोमेट्रिक टूल्सचे एकत्रीकरण” या विषयावर मार्गदर्शन करत औषधी वनस्पती संशोधनात आधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता अधोरेखित केली. अध्यक्षस्थानी डॉ. आर. बी. जाधव उपस्थित होते.

यानंतर श्री. संतोष आवसारकर यांनी “कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित औषधनिर्मिती प्रक्रिया” या विषयावर भाष्य करत गुणवत्ता-केंद्रित रचना पद्धती व डेटा-आधारित प्रक्रियेच्या साहाय्याने औषधनिर्मितीतील गुणवत्ता कशी वाढवता येते याचे सविस्तर विवेचन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. संतोष यू. येळे होते. दुपारच्या सत्रात डॉ. मीनाक्षी पटेल यांनी ऑनलाइन माध्यमातून “कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम साहित्य विश्लेषण व संशोधन लेखन सहाय्य” या विषयावर मार्गदर्शन केले.

संशोधन लेखनात AI च्या प्रभावी भूमिकेचे त्यांनी स्पष्टीकरण दिले. अध्यक्ष म्हणून डॉ. शंकर ढोबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलाक्षी नेरकर व प्रा. प्रतिमा पोकळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. प्रियंका देवरंकर यांनी केले. विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभत ही परिषद यशस्वीरीत्या पार पडली.

### उत्स्फूर्त सहभाग व समारोप

परिषदेत विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व औषधनिर्मिती क्षेत्रातील व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. चर्चासत्रे, प्रश्नोत्तरांचे सत्र व प्रात्यक्षिकांमुळे सहभागींचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला. समारोप समारंभात उत्कृष्ट संशोधन सादरीकरणांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. ही परिषद संशोधन क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला चालना देणारी ठरली असून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी व नैतिक वापरासाठी दिशा दाखवणारी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले.

### तिसरा दिवस : संशोधन व प्रकाशनातील AI

परिषदेच्या तिसऱ्या दिवशी (१ मार्च २०२६) श्री. तेजस सोमय्या यांनी संशोधन प्रकाशन व उच्च प्रभावी जर्नल इंडेक्सिंगमध्ये AI चे धोरणात्मक एकत्रीकरण यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. मुकेश रत्नपारखी होते. डॉ. अजिनाथ शिरसाठ यांनी फार्मास्युटिकल मॅन्युफॅक्चरिंग व गुणवत्ता नियंत्रणामध्ये AI चा वापर यावर सखोल माहिती दिली. अध्यक्ष म्हणून डॉ. स्वाती देशमुख उपस्थित होत्या. तसेच श्री. सोमदत्त चौधरी यांनी “कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम औषध शोध प्रक्रिया” या विषयावर श्रॉडिंगर संगणकीय सॉफ्टवेअरच्या सहाय्याने प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करत संशोधनातील नव्या शक्यता उलगडून दाखवल्या. या सत्राचे अध्यक्ष डॉ. गणेश आंधळे होते.

# मोशीतील वाहतूक कोंडी तात्काळ सोडवा!

## नगरसेवक निखील बोऱ्हाडे यांचा 'नो पार्किंग' झोनसाठी पाठपुरावा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी प्रभाग क्रमांक ०२ मधील वाढती वाहतूक कोंडी, अवैध पार्किंग आणि अपघातांच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी नगरसेवक निखील बोऱ्हाडे यांनी पुढाकार घेत वाहतूक विभागाकडे ठोस मागण्या मांडल्या आहेत. प्रमुख सिग्नल चौकांपासून १०० मीटर परिसर 'नो पार्किंग' घोषित करण्यासह बोऱ्हाडेवाडी ३१ मीटर रोडवर जड वाहनांसाठी कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे.**



मोशी प्रभाग क्रमांक 02 मधील वाढती वाहतूक कोंडी, अवैध पार्किंग व अपघातांच्या घटनांवर आळा घालण्यासाठी नगरसेवक निखील शिवाजी बोऱ्हाडे यांनी पुढाकार घेतला आहे. आदरणीय महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित विषयावर चर्चा करून बोऱ्हाडे यांनी पिंपरी चिंचवड वाहतूक विभागाकडे लेखी निवेदन सादर केले.

हे निवेदन मा. पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग, पिंपरी-चिंचवड पोलीस यांना देण्यात आले. यामध्ये प्रभागातील प्रत्येक प्रमुख सिग्नल चौकापासून किमान 100 मीटर अंतर दोन्ही बाजूंनी 'नो पार्किंग' झोन घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी नगरसेवक बोऱ्हाडे यांनी पुढील उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी केली आहे. सर्व सिग्नल चौकांपासून 100 मीटरपर्यंत स्पष्ट 'नो पार्किंग' झोन जाहीर करून फलक व रस्ते चिन्हांकन करणे. नियमभंग करणाऱ्या वाहनांवर नियमित कारवाईसाठी वाहतूक पोलीस कर्मचारी नियुक्त करणे.

आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही व डिजिटल साइनबोर्ड बसविणे. बोऱ्हाडेवाडी येथील 31 मीटर रोडवर जड वाहनांसाठी कायमस्वरूपी 'नो पार्किंग' झोन जाहीर करणे.

### वाहतूक विभागाची पाहणी..

या संदर्भात वाहतूक विभागाचे पी. आय. रामचंद्र घोडके यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पाहणी केली असून लवकरच संबंधित ठिकाणी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती वाहतूक पोलीस उपायुक्त यांनी दिली आहे. नगरसेवक निखील बोऱ्हाडे यांच्या या सकारात्मक पुढाकारामुळे मोशी-बोऱ्हाडेवाडी परिसरातील भारत माता चौक, लक्ष्मी चौक, श्रीराम चौक तसेच 31 मीटर रोड परिसरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नागरिकांनाही या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती दिली आहे.

"मोशी प्रभाग ०२ मधील नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागतो. सिग्नल चौकांजवळील अवैध पार्किंगमुळे अपघातांचा धोका वाढतो. त्यामुळे १०० मीटर 'नो पार्किंग' झोन आणि ३१ मीटर रोडवर जड वाहनांसाठी कायमस्वरूपी बंदी ही काळाची गरज आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुरळीत वाहतुकीसाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे."

– निखील बोऱ्हाडे, नगरसेवक, मोशी.

# प्रतिभा ज्युनिअर कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ज्युनिअर कॉलेज, चिंचवड येथे प्राचार्यांच्या प्रोत्साहनाने आणि मराठी विभागाच्या प्रा सुरेखा कुंभार यांच्या पुढाकाराने मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मराठी भाषा, साहित्य व सांस्कृतिक परंपरेबद्दल विद्यार्थ्यांमध्ये अभिमान निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**




कार्यक्रमाची सुरुवात आकर्षक ग्रंथ दिंडीने झाली. विद्यार्थ्यांनी मराठी साहित्यिकांचे ग्रंथ हातात घेऊन घोषणाबाजी करत मराठी भाषेचा गौरव केला. यानंतर सभागृहात सरस्वती वंदना आणि महाराष्ट्र गीत सादर झाल्यावर प्रा सुरेखा कुंभार यांनी प्रस्ताविक केले. महाविद्यालयच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी आपल्या मनोगतामध्ये मराठी भाषेचे महत्त्व सांगून मराठी भाषेचे संवर्धन करणे हीं प्रत्येकाची जबाबदारी आहे असे सांगितले. यानंतर शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी प्रभावी कविता सादरीकरण करत मराठी साहित्याची समृद्ध परंपरा उलगडून दाखवली.

कार्यक्रमाला संस्थेचे मान्यवर व्यक्ती उपस्थित होते तसेच सर्व शिक्षक, व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संस्थेच्या वतीने संस्थेचे सचिव डॉ.दीपक शहा, संस्थेच्या खजिनदार डॉ.भूपाली शहा, डॉ. तेजल शहा यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे प्रा.डॉ रवींद्र निरगुडे यांनी केले तर आभारप्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. वर्षा निगडे यांनी केले.

### विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांची दाद..!

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाट्यप्रयोगाला उपस्थितांची विशेष दाद मिळाली. तसेच पारंपरिक लोककलेचा वारसा जपणारे भारूडचे सादरीकरण कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. या उपक्रमातून मराठी संस्कृतीची ओळख नव्या दम्याच्या युवा पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संदेश देण्यात आला. हा कार्यक्रम सर्व शिक्षकांच्या, विद्यार्थ्यांच्या उस्फुर्त सहभाग व सहकार्याने यशस्वी पार पडला.

# चऱ्होलीत भुयारी केबलचे काम अखेर मार्गी!

## नागरिकांना दिलासा : नगरसेवक सचिन तापकीर यांचा पुढाकार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चऱ्होली प्रभाग क्रमांक ३ मधील मोरया नगर, ताजणे मळा परिसरातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. गेल्या अनेक दिवसांपासून भुयारी केबल टाकण्याचे काम प्रलंबित होते, ज्यामुळे रस्ते खोदकाम, अपूर्ण कामे आणि वारंवार अडचणींमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.**



भाजपा आमदार महेश लांडगे आणि मा. महापौर नितीन काळजे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक सचिन तापकीर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि संबंधित विभागांच्या सहकार्यामुळे अखेर भुयारी केबल टाकण्याचे काम पूर्णत्वास गेले आहे. या कामामुळे वारंवार होणारे खोदकाम कमी होणार असून वीजपुरवठा आणि इतर मूलभूत सेवांमधील व्यत्ययही कमी होण्यास मदत होणार आहे. नागरिकांना या सुधारणा मोठा दिलासा देणार आहेत आणि परिसरातील मूलभूत सुविधांच्या अधिक सक्षम विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, नगरसेवक सचिन तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित काम केले गेले. चोविसावाडी येथील ड्रेनेज चेंबर आणि वडमुखवाडी येथील रस्त्यात मोठा खड्डा निर्माण होऊन त्यात पाणी साचत होते. दोन्ही कामे यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली आहेत. नगरसेवक सचिन तापकीर यांनी सांगितले की, “परिसरातील सुविधा अधिक सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न सतत सुरू आहे आणि नागरिकांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद देणे ही आमची प्राथमिकता आहे.”

याशिवाय, अलंकापुरम रोडवरील साईड पट्टीची दुरुस्ती आणि डांबरीकरणाचे काम देखील यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे. वाहतुकीस त्रास होऊ नये व ट्रॅफिकची कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी नियोजनपूर्वक हे काम रात्रीच्या वेळेत केले गेले.

> “मोरया नगरमधील नागरिकांच्या सोयीसाठी भुयारी केबल टाकण्याचे काम तसेच रस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे. हे काम वेळेत आणि नियोजनपूर्वक पूर्ण करणे आमच्या प्राथमिकतेत होते, कारण अपूर्ण कामांमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करणे गरजेचे होते. आम्ही केवळ भुयारी केबल नव्हे, तर ड्रेनेज चेंबर, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधा सुस्थितीत ठेवण्यावर लक्ष केंद्रित करतो. नागरिकांच्या तक्रारी आम्ही त्वरित नोंदवतो आणि त्यावर तत्काळ उपाय करतो. भविष्यातही मोरया नगरच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सुविधा अधिक सुलभ करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करणार आहोत.”
>
> – सचिन तापकीर,
> नगरसेवक, चऱ्होली.

## न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन अत्यंत उत्साहपूर्ण व अभ्यासपूर्वक वातावरणात करण्यात आले. विज्ञान क्षेत्रातील महान शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांच्या जयंतीचे औचित्य साधून हा कार्यक्रम दिमाखदार पद्धतीने साजरा करण्यात आला.**



कार्यक्रमाची सुरुवात सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सचिव श्री. अशोक मोरे सर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार सर, खजिनदार सौ. सुरेखा पवार मॅडम, मुख्याध्यापिका सौ. विद्या नाईक मॅडम, अग्निस मॅडम तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे कौतुक केले.

MILLENNIUM EDUCATIONAL SOCIETY
कर्मस्य साफल्यम्

या विज्ञान प्रदर्शनात शाळेतील प्री-प्रायमरीसह सर्व वर्गांतील विद्यार्थ्यांचा लक्षणीय सहभाग होता. विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग, मॉडेल्स व संकल्पना प्रभावीपणे सादर केल्या. पर्यावरण संवर्धन, ऊर्जा बचत, सौरऊर्जा, जलसंधारण, तसेच दैनंदिन जीवनातील विज्ञान या विषयांवरील प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले.

### विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीचे आणि कल्पकतेचे कौतूक...

विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे प्रमुख पाहुणे तसेच पालक भारावून गेले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीचे C कौतुक करताना सांगितले की, “या शाळेतून भविष्यात उच्च दर्जाचे शास्त्रज्ञ घडतील आणि ते शाळेचे तसेच पिंपरी-चिंचवड शहराचे नाव उज्ज्वल करतील.” विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, संशोधनाची आवड आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याचे समाधान आयोजकांनी व्यक्त केले. विज्ञान क्षेत्रातील महान शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# मोशीतील पीएमएवाय प्रकल्पातील समस्या मार्गी

## क्लब हाऊस, मैला शुद्धीकरण प्रकल्पाचा प्रश्न; सोसायटी फेडरेशनचे यश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) सेक्टर 12 मधील पी.एम.ए.वाय.(प्रधान मंत्री आवास योजना) गृहप्रकल्पातील 5000 सदस्यांचे क्लब हाऊस आणि मैला शुद्धीकरण प्रकल्प याबाबत वर्षभर चाललेल्या अडचणी अखेर मार्गी लागल्या आहेत.**






प्राधिकरणाने चुकीच्या पद्धतीने क्लब हाऊस महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्याने सोसायटीधारकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता. तसेच, 45 सहकारी गृहरचना संस्थांसाठी बसवण्यात आलेल्या सिंपल ट्रीटमेंट प्लांट (STP) ला सोसायटीकडून हस्तांतर न मिळाल्यामुळे प्रकल्प बंद होता. त्यामुळे पाणी टंचाईसह परिसरात दुर्गंधी पसरली होती. या समस्यांवर उपाय करण्यासाठी चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन मार्फत आज महानगर आयुक्त योगेश म्हसे यांच्याशी बैठकीत चर्चा झाली. आयुक्तांनी बैठकीत स्पष्ट केले की, क्लब हाऊसचे चुकीच्या पद्धतीने केलेले हस्तांतरण मागे घेतले जाईल आणि ते संबंधित गृहप्रकल्पात परत हस्तांतरित केले जाईल. तसेच, बंद असलेला मैला शुद्धीकरण प्रकल्प त्वरित चालू करण्याचे आदेश दिले गेले. पुढील आठ ते दहा दिवसांत याबाबत परत बैठक घेऊन सोसायटीकडून प्रकल्प हस्तांतरित होईल असेही आश्वासन मिळाले. सोसायटीधारकांनी ही घोषणा ऐकून दिलासा घेतला आणि परिसरात आनंदाचे वातावरण आहे. याशिवाय, सेक्टर 12 मधील दुसऱ्या रस्त्यावरील धूळ आणि राडारोडा दूर करून रस्ता लवकर चालू करण्याचेही आदेश आयुक्तांनी दिले. सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी सांगितले, "सदर प्रकल्पांमध्ये झालेल्या चुकीच्या निर्णयामुळे सोसायटीधारकांना वेठीस धरले गेले होते. आजच्या बैठकीनंतर प्रशासनाकडून योग्य निर्णय घेण्यात आले आणि आम्ही सदैव सोसायटीधारकांच्या हक्कासाठी उभे राहू." हे पाऊल सोसायटीधारकांसाठी मोठा दिलासा असून, भविष्यातील समस्यांवर तत्परतेने तोडगा काढण्याची दिशा दाखवते.

> "सेक्टर-१२ मधील प्रधानमंत्री आवास प्रकल्पामध्ये होणाऱ्या चुकीच्या निर्णयांमुळे आमचे सोसायटीधारक अनेक वर्षे वेठीस होते. क्लब हाऊस, मैला शुद्धीकरण प्रकल्प आणि पाणी व्यवस्थापनासंबंधी समस्या यामुळे जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत होता. आजच्या बैठकीत आयुक्त श्री. योगेश म्हसे यांनी दिलेल्या स्पष्ट आश्वासनामुळे सोसायटीधारकांना न्याय मिळाला आहे. आम्ही, चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन, सदैव सोसायटीधारकांच्या हक्कासाठी उभे राहतो आणि भविष्यातही कोणत्याही अन्यायाविरुद्ध प्रामाणिकपणे संघर्ष करणार आहोत.
>
> – संजीवन सांगळे, अध्यक्ष, सोसायटी फेडरेशन.

# पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासाठी सदैव कटिबद्ध...!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचा ठाम विश्वास विधी समितीच्या प्रस्तावित अध्यक्षा सुजाता बोराटे यांनी व्यक्त केला. पिंपरी-चिंचवड महापालिका विधी समिती अध्यक्षपदासाठी त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आपला नामनिर्देशन अर्ज दाखल केला.**



यावेळी आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पक्षाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना बोराटे म्हणाल्या, "विधी समितीचे काम अधिक पारदर्शक, गतिमान आणि जनहिताभिमुख करण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करेन. शहरातील विकासकामांना कायदेशीर बळ देत नागरिकांच्या हिताचे निर्णय प्राधान्याने घेतले जातील." राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. सुजाता बोराटे यांच्या नेतृत्वाखाली विधी समिती शहराच्या विकासात प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

> "पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी माझा कटिबद्ध निर्धार आहे. विधी समितीच्या माध्यमातून आम्ही प्रत्येक निर्णय पारदर्शक, न्याय्य आणि नागरिकांच्या हितासाठी घेऊ. आमचे सर्व उपक्रम शहरवासीयांच्या सुविधा, सुरक्षितता आणि कल्याणासाठी केंद्रित असतील. माझे ध्येय आहे की प्रत्येक नागरिकाला त्यांच्या प्रश्नांचे तत्पर आणि योग्य निराकरण मिळावे आणि शहरातील विकासकामे सुचारू आणि प्रभावीपणे पार पाडली जावीत. मला विश्वास आहे की, एकजुटीने कार्य केल्यास पिंपरी-चिंचवड शहर एक आदर्श आणि प्रगत महानगर बनू शकेल."
>
> – सुजाता बोराटे, अध्यक्षा, विधी समिती.

# होळीनिमित्त सजली माऊलींची समाधी



**आळंदी** | होळीच्या मंगलमय आणि रंगोत्सवी वातावरणात श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर येथे यंदा आकर्षक सूर्यफुलांच्या भव्य पुष्पसजावटीने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. रंगोत्सवाच्या पार्श्वभूमीवर साकारलेली ही अनोखी आरास भक्तांसाठी प्रमुख आकर्षण ठरली. मंदिराच्या गाभाऱ्यात आणि परिसरात हजारो झगमगत्या पिवळ्या सूर्यफुलांची सजावट करण्यात आली होती. या देखण्या आरासीतून संपूर्ण परिसर प्रसन्नता आणि चैतन्याने उजळून निघाला. पारंपरिक फुलांसह सूर्यफुलांचा कल्पकतेने वापर करून निसर्ग आणि भक्तीभाव यांचा सुंदर संगम साधण्यात आला होता. अनेक भाविकांनी या सजावटीचे कौतुक करत ती मनाला आनंद देणारी असल्याची भावना व्यक्त केली. होळी निमित्त सकाळपासून अभिषेक, कीर्तन आणि हरिनाम संकीर्तनाचे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.